IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# "स्त्री चळवळीतील भिन्न विचारप्रवाह"

**डॉ. गणेश सुकदेव रोडे,**
राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र, मविप्र समाज, के.आर.टी. आर्टस,
बी.एच कॉमर्स ॲण्ड ए.एम सायन्स (के.टी.एच.एम) महाविद्यालय, नाशिक, महाराष्ट्र.
(महाविद्यालय संलग्न – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.)

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*स्त्रीवादी चळवळ, उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, मूलग्राही स्त्रीवादी, समाजवादी स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद.*

**ABSTRACT**

स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांचे दुय्यमत्व, शोषण याविरोधी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण होय. म्हणून स्त्री चळवळ ही स्वत:च्या शोधासाठीचा संघर्ष आहेत (लिंडा गार्डन). ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रीवादामध्ये काही भिन्न प्रवृत्ती सहजपणे आपण पाहू शकतो. इंग्लंड आणि अमेरिका या दोन देशांमध्ये आपल्याला लोकशाहीवादी, उदारमतवादी स्त्रीवादाची फार जुनी परंपरा दिसते. तिची दिशा स्त्रियांसाठी समान हक्क आणि समान संधी अशी दिसते. त्यामुळे स्त्री चळवळ विविध देशात सक्रीय होऊन चळवळीस विविध राजकीय छटा, विश्लेषणाच्या विविध पद्धती, मूल्यक्रम आहेत. स्त्री चळवळीचे स्वानुभवाचे कथन, राष्ट्रीयत्व व धर्म यांचा हिप्नोटीझम (hypnotism), स्वयंसेवी संस्थांचे कृतिकार्यक्रम यामुळे स्त्रीवादी चळवळीचे वर्गीकरण करणे अवघड आहे. एखाद्या सिद्धांताच्या नियमाप्रमाणे एका देशात एकाच विचारांची स्त्रीवादी चळवळ असते असे नाही. अशी कच्ची बांधणी काहीवेळा अडचणीची ठरते. कारण प्रत्येक विचारप्रवाहाचा किंवा दृष्टीकोनाचा काही अंशी तरी दुसऱ्या दृष्टीकोनाशी संवाद सहकार्य असते. काहीवेळा भिन्न समजला जाणारा दृष्टीकोन हा पूर्वीच्या विचारप्रवाहाचा विस्तारित दृष्टीकोन असतो. १९ व्या शतकात स्त्री चळवळ अमानुष प्रथेविरुद्धची चळवळ म्हणून जी सरंजामशाही पुरुषप्रधान व्यवस्थेला शत्रू कल्पित असे, या काळात स्त्री चळवळीच्या संघर्षात सरंजामी व्यवस्थेचा आधार असणाऱ्या जाती नेतृत्व करीत होत्या.१ पश्चिमी जगात उदारमतवादी विचारप्रणालीतून उदयाला आलेल्या स्त्रीवादामध्ये काळाबरोबर भिन्न विचारप्रवाह आकार घेत गेले. अलीकडे स्त्रिवादाच्या भिन्न दृष्टीकोनांमध्ये उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, जहालवादी वा अलगतावादी, अब्राम्हणी व दलित चळवळ, पर्यावरणवादी स्त्रीवाद असे प्रवाह निर्माण झाले आहेत. सर्व स्त्रीवादी दृष्टीकोनात साम्य म्हणजे स्त्रियांना माणूस या नात्याने पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत हे आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Rode, G. S. (2026). स्त्री चळवळीतील भिन्न विचारप्रवाह. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 726–735.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :** १. स्त्रीवादातील भिन्न विचारप्रवाह जाणून घेणे, २. स्त्रीमुक्ती व स्त्री स्वातंत्र्यात विविध विचारधारांचे महत्त्व स्पष्ट करणे. ३. समकालीन स्त्री चळवळीची विचारधारा अभ्यासाने.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच गुणात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे. संशोधन साहित्यात द्वितीय स्त्रोतांचा अवलंब केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, अप्रकाशित सोधप्रबंध, संकेतस्थळ इत्यादींचा आधार घेतला आहे.

**प्रस्तावना :**

स्त्री सक्षमीकरण व स्त्री मुक्तीच्या दृष्टीने विसावे शतक हे मानवी इतिहासातील महत्वपूर्ण आहे. डॉ. भास्कर भोळे यांनी सहाव्या विचारवेध संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात 'विसावे शतक हे पर्यायाचे शतक' असे प्रतिपादन केले. श्री. दिलीप चित्रे यांनी 'शतकांचा संधिकाल' या सकाळ मधील लेखमालेतून या शतकाची स्वप्ने आणि स्वप्नभंग, आकांक्षा आणि त्यांची सिद्धी, वेदना आणि संवेदना यांचे रेखाटण मराठी वाचकांसाठी सादर केले होते. समाज परिवर्तनाची, समाज विकासाची आणि समग्र क्रांतीची जेवढी प्रारूप विसाव्या शतकात सादर झाली, तेवढी मानवी इतिहासात आजवर क्वचितच पुढे आली असतील. या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकात प्रबोधन युगाने जाग्या केलेल्या सर्व आकांक्षा संबंधीचे प्रयोग विसाव्या शतकाने करून पहिले, काही फसले, काही यशस्वी झाले, तर काहींनी मानवी सामर्थ्य व क्षमता वाढविल्या. प्रा. यशवंत सुमंत यांच्या मते, "विसाव्या शतकात विकासाच्या गाथेने विनाशाची साथ द्यायला सुरवात केली. भाषा संघर्षाची, व्यवहार तत्वशून्य तडजोडींचा, वाणी व्यवस्थाबद्दलची, प्रयत्न व्यवस्थेत अधिकाधिक अवकाश शोधण्याचे, ओठात मुक्ती आणि पोटात दास्यवृत्ती अशी विसंगती प्रत्ययास येत चालली. परिणामत: विसावे शतक निव्वळ पर्यायाचे नव्हे तर पर्यायांचा विपर्यासाचे व तदजन्य मर्यादांचे ही शतक ठरले. या मर्यादांचे उल्लंघन कसे करायचे हा सर्व मुक्ती लढ्यांपुढील प्रश्न आहे." स्त्रीमुक्तीचा लढा हा अशाच मुक्ती लढ्यांपैकी एक आहे. स्त्रीमुक्तीतून मानवमुक्तीचा प्रयास हे अंतिम ध्येय स्त्रीवादी चळवळीचे असल्याचे दिसते. प्रा. सुमंत यांच्या विचारातून मुक्तीचा अर्थ असा की, "माणसाला मुक्तीची प्रेरणा त्या विचारप्रवणतेत लाभलेली असते. मुक्त झाल्याशिवाय व्यक्त होऊ शकत नाही आणि व्यक्त झाल्याशिवाय तो असू शकत नाही. या 'असण्याच्या' ध्यासातून मुक्तीशी संबंध जुळतो. मुक्तीच्या विचाराचा प्रवास पारंपारिक समाजापासून जन्म-मृत्युच्या संदर्भात, धर्मसंस्थेच्या संदर्भात व्यक्त झाला आहे. बुद्धांच्या विवेकवादाने ईश्वर नाकारला, परलोक नाकारला आणि मुक्तीचा विचार दु:खमुक्तीच्या अंगाने पण व्यक्तीच्या संदर्भात केला."[२] हे स्त्रीवादातील भिन्न विचारप्रवाहातून दिसून येते

**१. उदारमतवादी स्त्रीवाद :**

सतराव्या व अठराव्या शतकामध्ये उदारमतवादी तत्वज्ञानातून स्त्रीवादी विचारप्रवाह उदयाला आला, आणि दुसऱ्या महायुद्धानंतर साठोत्तर स्त्रीचळवळीत सर्वप्रथम लोकप्रिय व प्रभावी ठरलेला विचारप्रवाह म्हणजे उदारमतवादी स्त्रीवाद होय. मेरी वॉलस्टोनक्राफ्ट, जे.एस.मिल, हॅरियर टेलर, मागरिट फुल्लर, हरियट मार्टिनो, ल्युक्रेशिया मॉट, एलिझाबेथ कॅंडी स्टॅंटन तसेच बेटी

फ्रिडन, जेनेट रँडक्लिफ रीचडर्स आणि सुसान मॉलर ऑकिन पर्यंतच्या उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी पश्चिमी विचार विश्वात स्त्रीवादाची मांडणी केली आहेत. या सर्वांनी उदारमतवादी तत्वविचारातील विवेकवाद, समता, स्वातंत्र्य, व्यक्तिवाद या मूल्यांचा स्वीकार करून त्या प्रकाशात स्त्री जीवनाची व स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची चिकित्सा केली.

अठराव्या शतकामधील उदारमतवादी स्त्रीवादी विचाराने स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान शिक्षण मिळावे, एकोणीसाव्या शतकात आर्थिक विकासाच्या व नागरी हक्कांच्या समान संधी मिळाव्या आणि विसाव्या शतकात स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समानतेची वागणूक, स्त्री-पुरुषांना समान दर्जा मिळावा या स्वरुपात मागण्या मांडल्या गेल्या.[३] पुढे उदारमतवादी स्त्रीवादाद्वारे असे मानण्यात आले की स्त्री पुरुषातील लैंगिक व सामाजिक विषमता ही सामाजिक न्यायावर आधारित कायदे व वैचारिक प्रबोधनातून नष्ट करता येईल. उदारमतवादी स्त्रीवादाचे प्रमुख ध्येय सर्व स्त्रियांना कायदेशीर व राजकीय समता प्राप्त करून देणे हे आहे. या स्त्रीवादी विचारधारेने स्त्रियांना खाजगी जीवनात स्वास्थ, सहकार्य व शांतता यांचे महत्व मान्य केले. आधुनिक भंडावलशाही व्यवस्थेला त्यांना आव्हान देण्याची आवश्यकता नाही तर वैधानिक प्रक्रियेद्वारे कायद्यांमध्ये सुधारणा घडवून स्त्रीमुक्तीचा प्रवास उदारमतवादी स्त्रीवादात अभिप्रेत आहे.[४] बेटी फ्रिडन यांच्या 'दि फेमिनी मिस्टेक' या पुस्तकात अमेरिकेतील मध्यमवर्गीय स्त्रियांच्या जीवनातील उणीवा स्पष्ट करतांना स्त्रियांनी त्यातून बाहेर पडण्यासाठी 'सुपर वूमन' बनून कर्तबगारीची आणि आघाडीची क्षेत्र निवडली पाहिजे असे सांगतात. 'द सेकंड स्टेज' या पुस्तकात बेटी फ्रिडन सांगते की, 'स्त्री मुक्ती मध्ये पुरुष मुक्ती आहे. स्त्रीमुक्तीत पुरुषांना काही सवलतींना मुकावे लागणार आहे, त्या बदल्यात त्यांना आर्थिक उत्पादन व देश संरक्षणाच्या एकाकी जबाबदारीतून काही अंशी सुटका मिळणार आहे'.[५] स्त्री मुक्तीचा प्रश्न हा जसा मानवजातीच्या निकोप स्वास्थ्याचा आहे, तसाच तो मानवमुक्तीचा महत्वाचा भाग आहे. उदारमतवादी स्त्रीवाद हा एकाबाजूला स्त्रीला पारंपरिक बंधनातून मुक्त करून तिच्या प्रश्नांचा उदारमतवादी तत्वज्ञानाच्या परिघात विचार करून समाजाची वैचारिक व विवेकी बांधणी करू पाहतो तर दुसऱ्या बाजूला शासनाद्वारे कठोर कायदे, नियम करून स्त्री सबलीकरणासाठी पुढाकार घ्यावा अशी पण अपेक्षा व्यक्त करतो.

उदारमतवादी स्त्रीवादी विचारप्रवाहाने व्यक्तीस्वातंत्र्याला सामुदायिक हितापेक्षा अवास्तव महत्त्व दिले आहे. मेरी यंग (१९८४) यांच्या मते, 'मानवाची बुद्धिवादी परिदृष्टी ही शरीरापेक्षा श्रेष्ठ दर्जाची असते'. हेच उदारमतवादी स्त्रीवादाचे गृहीतक आहे. परिणामी स्त्रीवादात या विचारांच्या मांडणीमुळे स्त्री शरीरव्यवहाराचे अवमूल्यन झालेले आहे, या भूमिकेमुळे राजकीय अलिप्ततावाद हा त्यातून डोकावतांना दिसतो. (व्हेल्हन १९९५)

### २. मार्क्सवादी स्त्रीवादी विचारप्रवाह :

कार्ल मार्क्स यांच्या साम्यवादी विचारधारेच्या आधारावर मार्क्सवादी स्त्रीवादाचे तत्वज्ञान स्पष्ट केले जाते. मार्क्स आणि एंजेल्सच्या आरंभीच्या लेखनात स्त्री प्रश्नाची फारशी चर्चा झालेली आढळत नाही. समाजवाद प्रस्थापित होताच स्त्रिया मुक्त होतील असा सर्वसाधारण विचार मार्क्सच्या 'On the jewish question' या पुस्तकात दिसतो. मार्क्स आणि एंजेल्सचे स्त्रीविषयक चिंतन हे बऱ्याच अंशी भावनामय समाजवादाच्या (युटोपियन सोशॉलिस्ट) लेखनाने प्रभावित आहे. या विचारानुसार ऐतिहासिकदृष्ट्या खाजगी संपत्तीच्या उदयातच स्त्रियांच्या दडपणुकीची कारणे सापडतात. म्हणून त्यांच्या मते स्त्रीमुक्तिवाद हा

साम्यवादी समाज अस्तित्वात आणण्यासाठी द्यावयाच्या लढ्याचाच एक भाग आहे. एंजेल्स ने त्याच्या ‘द ओरिजन ऑफ द फमिली प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट’ या ग्रंथात असे स्ष्ट केले की, “इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात मातृसत्ताक व्यवस्था होती. या समाज व्यवस्थेत स्त्रीला निवडीचे स्वातंत्र्य, लैंगिक संबंधामध्ये मुक्तता होती. कुटुंबावर, घरावर स्त्रीचे नियंत्रण होते. इतिहासातील विकासाच्या टप्प्यावर शेतीचा शोध लागला आणि ही व्यवस्था पितृसत्ताक झाली. मानवी इतिहसात विवाह संस्था उदयाला आली. पुरुषाला कुटुंबामध्ये सर्वोच्च स्थान मिळाले. त्यांच्या संपत्तीला वारसा असणारी मुले त्याचीच असली पाहिजे अशी अट निर्माण झाली. पुरुषांना निती नियमांपासून मुक्तता तर स्त्रीला पावित्र्य, शुद्धता हवी, आणि विवाहाचा अधिकार केवळ पुरुषांना असे दुय्यम स्थान प्राप्त झाले. भांडवलशाही व्यवस्थेच्या उदयाबरोबर स्त्रीचे आणखी अवमूल्यन झाले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळया तऱ्हेच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. कारण स्त्रियांचे श्रम स्वस्तात मिळवून एकूण मजुरी कमी ठेवणे ही भांडलशाहीच्या लाभाची गोष्ट पुरुषी वर्चस्वातून साधली जाते. स्त्रियांच्या घर कामाला मोल नसते, हे भांडवलशाहीच्या पथ्यावर असते. त्यामुळे स्त्रियांना सार्वजनिक जीवनात स्वातंत्र्य, समान सहभाग घेता आला पाहिजे. स्त्रियांनी भांडवलशाहीच्या विरोधात उभे राहिले पाहिजे या संघर्षात मातृत्व, बालसंगोपणाच्या जबाबदारीचे सार्वत्रिक समाजिकरण व्हावे.”[७] या स्वरुपात एंजेल्सने मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली.

हार्टमन हायडी यांच्या मते, मार्क्सवादी स्त्रीवादात पितृसत्ताक व्यवस्था व भांडवलशाही यामधील परस्पर संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. हार्टमन हे ऐतिहासिक विश्लेषण पद्धतीच्या आधारे स्ष्ट करतात की, पुरुषप्रधान व्यवस्थेत भांडवलशाहीचा विकास झाला. कुटुंब, कामाचे ठिकाण येथे लिंगभेदाद्वारे श्रमविभागणी मोठ्याप्रमाणावर झालेली आहे. फ्रान्समध्ये सन १९९० च्या दशकात भैतिकवादी स्त्रीवादी ‘ख्रिस्तींनी डेकली’ आणि ‘सिल्व्हिया बाल्बी’ (१९८६) या प्रमुख स्त्रीवादी अभ्यासकांनी घरगुती कामाच्या चौकटीत स्त्रियांचे शोषण कसे झाले, त्यामुळे स्त्रिया कशा दुय्यम ठरल्या’[८] या पद्धतीची मांडणी केली.

मार्क्सवादी स्त्रीवादाचे दोन प्रवाह दिसतात. त्यातील एक म्हणजे अभिजात मार्क्सवाद होय. या विचारप्रवाहवादाच्या मते, स्त्री दुय्यमत्वाचे कारण म्हणजे खाजगी संपत्तीपेक्षा ही पुरुषांद्वारे विकसित शस्त्रे व पुरुषी अहंकार यात आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या पुरुषांच्या दुहेरी नीतिमुळे कुटुंब, भांडवल व पुरुष हे एकमेकांचे सहभागीदार बनतात व त्यातून स्त्रीचे शोषण करतात. त्यामुळे स्त्रीला स्वयंपाक घर, घरकामे या निर्जीव वातावरणातून बाहेर काढले जात नाही तो पर्यंत स्त्रीला खरे स्वातंत्र्य मिळणार नाही, आणि तोपर्यंत समाजवादच काय पण लोकशाही सुद्धा येणार नाही.[९] दुसरा विचारप्रवाह आधुनिक मार्क्सवादी स्त्रीवाद्यांचा असून स्त्रीमुक्तीसाठी नवे पर्याय उपलब्ध झाले आहे असे त्यांना वाटते. बेनस्टन मार्गारेट (१९६९) यांच्या मते, स्त्रीच्या उत्पादक घरकामाला श्रममूल्य दिली जावे. पाणी, इंधन, सेवा इत्यादींमुळे एखाद्या कुटुंबाची आर्थिक बचत होते, तेवढे मूल्य जरी स्त्रीला दिले तरी तिला स्वत:च्या गरजा स्वत: भागवता येईल. नोकरी व्यवसायात कामाचे उत्तरदायित्व, जबाबदारीच्या स्वरुपात समान वेतन श्रेणी असावी, ती स्त्री – पुरुष अशी वेगळी नसावी, बालसंगोपनगृह, सार्वजनिक भोजनालये निर्माण करून घरकामातून स्त्रीला मुक्त करणे, स्त्रीला आरोग्य सेवा, साधने उपलब्ध करून बाईपणाच्या या आजारांवर काही प्रमाणात नियंत्रणे मिळविता येतील. एंजेल्सच्या मताप्रमाणे, ‘स्त्री केवळ मुले पैदा करणाऱ्या यंत्र राहणार नाहीत.’ अर्थात मार्क्सवादी स्त्रीवादाने स्त्रीमुक्तीची चळवळ

कष्टकरी स्त्री जीवनाच्या प्रश्ना पर्यंत नेली आहे. परंतु मुळात कुटुंबांतर्गत घडून येणारे बदल हे सामाजिक स्थितीशी संबंधित असल्याने समाजरचना बदलेली नाही. त्यामुळे कौटुंबिक संबंध तसेच राहिले. खाजगी संपत्ती, पतिव्रता, चारित्र्य, वेश्याव्यवसाय हे एकमेकांशी व सामाजिक नियमांशी संबंधित आहे. राजकीय व आर्थिक नियंत्रणातूनच लैंगिक वर्चस्व निर्माण होते. या विचाराचा विस्तार ऐतिहासिक भौतिकवादाचा आधार घेत मार्क्सवादी स्त्रीवादाने केला आहे.[१०]

### ३. जहाल वा मूलग्राही स्त्रीवादी विचारप्रवाह :

स्त्रीवादी विचारप्रवाहातील आक्रमक भूमिका घेणाऱ्या प्रवाहास जहाल स्त्रीवाद म्हणून संबोधले जाते. या स्त्रीवादासाठी रॅडिकल फेमिनिझम, प्रागतिक स्त्रीवाद किंवा मूलग्राही स्त्रीवाद असे म्हणतात. यातील जहालपणा मुख्यत्वे वैचारिक प्रागतिकतेच्या संदर्भात घेतला जातो. साधारणतः सन १९८० च्या दशकात कोणतीही एकच एक निश्चित भूमिका नसलेला आक्रमक स्त्रियांचा गट, विशिष्ट विचारांचे अनुनयित्व न स्विकारता उदारमतवाद, मार्क्सवाद यांच्यातील त्रुटी नाहीशा करण्याच्या उद्देशाने स्त्रीच्या शोषणाचे मर्म पुरुषसत्तेच्या सर्वंकषतेच्या संदर्भात शोधणारा, कौटुंबिक जीवनात स्त्री पुरुष संबंधाची पुर्नरचना करू पाहणारा विचार म्हणजे जहाल स्त्रीवाद होय. जहाल स्त्रीवाद मुख्यत्वे स्त्रीच्या 'स्त्री' म्हणून येणाऱ्या अनुभवावर आधारित विचार आहे. तो स्त्रियांनी स्त्रियांसाठी निर्माण केलेला एक मुक्तिदायी सिद्धांत आहे. त्यामुळे स्त्रियांचे जीवनानुभव, त्यांच्या कहाण्या (Narrations), त्यांच्या जाणिवांची जडणघडण, त्यांची संवेदनशीलता, जीवनदृष्टी, त्यांना प्रत्ययास आलेले सत्य या सर्व बाबींना या विचारात विशेष महत्त्व आहे.

जहाल स्त्रीवादानुसार सर्व शोषण प्रकारात 'स्त्री शोषण' हे सर्वात मूलभूत स्वरूपाचे व आद्य शोषण आहे. हे शोषण केवळ आर्थिक बाबींपुरते नसून, तर ते पुरुषप्रधान व्यवस्थेद्वारे घडविले जाते. त्यामुळे पुरुष सत्तेविरुद्धच्या लढ्यातील हा संघर्ष वर्गीय नसून लैंगिक संघर्ष आहे अशी या स्त्रीवादाची धारणा आहे. जहालवादी स्त्रीवादानुसार स्त्रियांचे शोषण हे सर्वांगीण स्तरावरचे आहेत. ते वंश, धर्म, जात, राष्ट्र या सीमारेषांना उल्लंघून जाणारे आहे. पुरुष वर्गाने स्वत:च्या हितसंबंधा संरक्षणासाठी स्त्री या वर्गावर नियंत्रण प्रस्थापित केले आहे. म्हणजे स्त्री व पुरुष यांच्यातील संबंध शोषित आणि शोषक या स्वरुपात असते. पुरुष नावाचा वर्ग हा स्त्री वर्गाचा वर्गशत्रू आहे, असे हा विचारप्रवाह मांडते. स्त्री मुक्तीच्या या संघर्षात काही पुरुषांचे समर्थन लाभले असले, तरी बहुसंख्य पुरुषांचा विरोध पाहता स्त्रियांना स्वबळाच्या शक्तीवर स्त्रीमुक्तीचा हा लढा लढावा लागेल. जहालवादी विचार प्रवाहानुसार स्त्रिया खाजगी जीवनात ही सुरक्षित नाही. स्त्री-पुरुष संबंध हे खाजगी व सार्वजनिक जीवनात सत्तात्मक आणि सोपानात्मक आहे म्हणून, जे जे खाजगी आहे ते ते राजकीय देखील आहे अशी भूमिका जहाल स्त्रीवाद घेतो.[११]

स्त्रिया पुर्नत्पादनाच्या कार्यमुळे पुरुषांपेक्षा मुळातच विषम पायावर उभ्या आहे. म्हणून स्त्रियांच्या मुक्तीसाठी कृत्रिमरीत्या मुल जन्माला घालण्याच्या तंत्राचा विकास आवश्यक आहे. ज्यामुळे पुर्नत्पादन (मानववंशाचे, श्रमशक्तीचे, मूल्यव्यवस्थेचे) आणि लैंगिकता म्हणजेच बाई या समीकरणापासून मुक्तता मिळेल. त्यातून कुटुंबसंस्था नाहीशी होईल आणि स्त्री पुरुषांच्या कामांचे साचेबंद स्वरूप नाहीसे होईल. केवळ शारीरीकतेवर आधारलेले कुटुंब संपल्यावर सर्वच तऱ्हेच्या लैंगिक दडपणापासून माणसाला मोकळीक मिळेल आणि स्त्री पुरुष निर्मितीक्षम आयुष्य जगू लागतील. स्त्रियांवरील बलात्कार, सत्तीचे बाळंतपण, लादलेले विवाह

यापासून सुटका मिळवण्यासाठी लैंगिकतेचा जो केवळ जननेंद्रियांशी संलग्न असा अर्थ लावला गेला आहे, त्याला छेद देण्याची भूमिका जहाल स्त्रीवादी विचारप्रवाहात आहेत.

'द सेंकड सेक्स' या ग्रंथाद्वारे सिमोन द बोव्हुआर यांच्या विचारातून या स्त्रीवादाची सुरुवात झाली. यामध्ये बोव्हुआर स्पष्ट करतात की, मानवाच्या विकास प्रक्रियेत स्त्रियांचे अवमूल्यन झाले आहे. स्त्रियांपेक्षा पुरुष श्रेष्ठ असतात असे पुरुषांनी बिंबवण्याचा सतत प्रयत्न केला. स्त्रियांना सुख, संरक्षण या बाबींच्या नावाखाली मातृत्व, घर, घरकाम अशा अनेक बंधनात बंदिस्त केले गेले. त्यामुळे जहाल स्त्रीवादानुसार स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंब, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक अशा सर्व विविध क्षेत्रात बदल झाले तरच नवी स्त्री निर्माण होईल.[१२] जहाल स्त्रीवादी विचारवंत केट मिलेट यांनी 'सेक्सुल पोलिटिक्स' (Sexual politics) १९७० या ग्रंथात स्पष्ट करतात की, 'सबंध जगात स्त्री आणि पुरुष यातील संबंध हे सत्तात्मक स्वरुपात आहे म्हणून ते राजकीय आहे'.[१३]

थोडक्यात जहाल स्त्रीवाद बहुकेंद्री लैंगिकतेचा विचार मांडतो तसेच स्त्रीवादी क्रांतीनेच स्त्री तिच्या पारंपरिक बंधनातून, शोषणातून मुक्त होईल अशी मांडणी करतो.

**४. समाजवादी स्त्रीवादी विचारप्रवाह :**

अभिजात मार्क्सवादी व जहाल स्त्रीवादी अशा दोन विचारप्रणालीच्या टोकाच्या भूमिका व दोष टाळून, मात्र त्यांनी दिलेल्या महत्वाच्या जाणीवा, अंतर्दृष्टी (Insights) घेऊन समाजवादी स्त्रीमुक्तीवादी विचारप्रवाह उभा राहतो. या स्त्रीवादाने क्रांतीची भाषा व लढावूपणा याबरोबर स्त्री व पुरुष समानतेचा विचार तेवढाच महत्वाचा मानला आहे. उदारमतवादी स्त्रीवादाप्रमाणेच समाजवादी स्त्रीवादास ही मार्क्सवादी, समाजवादी व डाव्या स्त्रीवादी विचारांची प्रदीर्घ परंपरा आहे. फुरीअर, सॉं सीमॉं समाजवादी, रॉबर्ट ओवेन, विल्यम थॉम्प्सन आणि ॲन व्हीलर सारख्या समाजवादी तत्वचिंतकांनी स्त्री प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार केला. स्त्रियांना घर कामात, घराबाहेरील कामात उत्पादन घटक मानून त्यांना आर्थिक बळ देणे आणि भांडवलशाही विरुद्धच्या संघर्षासाठी संघटीत करण्यापेक्षा शोषणाव्यतिरिक्त स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना उभे करावे. स्त्रीवादातील युटोपिया आणि मार्क्सवादातील पोथीनिष्ठता या दूर सारून समाजवादी स्त्रीवाद हा कामगार गटातील कामकरणाऱ्या स्त्रियांच्या माध्यमातून पुढे आणला आहे असे व्हेल्हन ईमेल्डां (१९९५) यांनी म्हंटले आहे. हा स्त्रीवाद वर्ग व लिंगभाव अशा दोन्ही जाणीवा सशक्त, समान ठेवून भांडवलशाहीच्या दडपणूक, शोषण या पासून स्त्रियांना मुक्त करू ईच्छिणारा विचारप्रवाह आहेत.

स्त्रीवादाची मांडणी केली. तिच्या मते, स्त्री केवळ कामगार नसते तर ती आई आणि बाई पण असते. धर्म, वंश, जाती जमाती या मधून येणाऱ्या शोषणाचा अनुभव स्त्रियांना असतो. पुरुषांच्या द्वारे होणारा लैंगिक छळ सार्वजनिक जीवनात, बाजारपेठेत प्रवेश न करू देण्याची वृत्ती त्यामुळे सर्व क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी सत्ता, संपत्ती, शक्ती असणे हा शोषणाचा प्रकार आहे. समाजवादी पक्षाने स्त्रियांचे समाजव्यवस्थेतील स्थान निर्माण करावे, घराचे, कुटुंब व्यवस्थेचे उच्चाटन करून सार्वजनिक पाळणाघर, भोजनालय सुरु करून स्त्रियांचा सार्वजनिक जीवनात सहभाग निर्माण करावा. स्त्रियांना विवाहावेळी साथीदार निवडण्याचे, लैंगिकतेचे स्वातंत्र्य असावे असे झाले तरच ॲलिसन यागर यांनी सांगितल्याप्रमाणे पाच विविध परात्मभावातून

स्त्रीची मुक्ती होईल. स्त्री शरीरावरील पुरुषांची मालकी, स्त्रीच्या इच्छेविरुद्ध मातृत्व लादणे, तिला स्वत:च्या मर्जीप्रमाणे संतती नियमन व गर्भपात करता येत नाही. स्त्रीला पुरूषांपेक्षा कमी आत्मविश्वास व कमी बुद्धी असते अशा नैराश्यातून तिच्यात परात्मभाव निर्माण होतो. व्यवस्थेत अशावेळी स्त्रियांना समान संधी, कौटुंबिक सन्मान, दर्जा, श्रममूल्य उपलब्ध करून दिले तर तिच्या नैराश्यावर तिला मात करता येईल. त्यासाठी शासकीय धोरणे, कल्याणकारी कायदे करून स्त्रियांचे व्यक्तित्व खऱ्याअर्थाने त्यांना बहाल करता येईल.

सोव्हियत युनियन मधील बोल्शेविक क्रांतीनंतर कोलान्टाय यांना लेनिनने कोम्मिसार मधील समाजकल्याण खात्यात पद प्राप्त करून दिले. त्याद्वारे त्यांनी स्त्रियांसाठी समान संधी, बाल संगोपणासाठी समुदाय केंद्र, शाळा व नर्सरीसाठी केंद्र यासारखी उपक्रम सुरु केली. स्त्रियांना घटस्फोट व गर्भपातास परवानगी दिली. परंतु लेनिनच्या निधनानंतर बहुतेक धोरणे, उपक्रम रद्द केली गेली. स्त्रियांवरची कौटुंबिक जबाबदारी पुन्हा त्याच्यावर आली. मार्क्सवाद आणि उदारमतवादी विचारसरणीतील अर्धा अर्धा विचार स्विकारल्याने समाजवादी स्त्रीवादाचे वेगळेपण फारसे जाणवत नाही. तसेच पुरुषप्रधान व भांडवलशाही व्यवस्थांच्या विसर्जनानंतर स्त्रियांच्या अस्तित्वातील भेद नष्ट होतील अशी शक्यता देखील वाटत नाही.[१४]

**५. पर्यावरणीय स्त्रीवादी विचारप्रवाह :**

स्त्रीवादी विचारसरणीत अलीकडच्या काळात उदयाला आलेला विचारप्रवाह म्हणजे पर्यावरणीय स्त्रीवाद होय. पर्यावरणाच्या प्रश्नांना जगात सर्वत्र महत्त्व आल्याने स्त्रीवादी अभ्यासकांनी स्त्रीप्रश्न आणि पर्यावरण यांचे नाते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्यातून हा विचारप्रवाह उदयाला आला. या स्त्रीवादी विचारप्रणालीनुसार पुरुषप्रधान व्यवस्थेने विकास व नफा यांच्या नावाखाली निसर्गाचा नाश, विध्वंस घडवून आणला आहे.[१५] सन १९७० च्या दशकातील उत्तरार्धात पर्यावरणीय स्त्रीवाद ही विचारसरणी जोर धरू लागली. 'Feminism or Death' या शब्दाचा फ्रँन्कोईज डीयूवॅान यांनी प्रथम वापर करून पर्यावरण व स्त्रीवाद यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. रुसो, महात्मा गांधी यांनी 'बॅक-टू- नेचर' असा संदेश देवून पर्यावरण व नागरिक यांच्या संबंधाचा एकत्रित विचार केला आहे. 'पर्यावरणवादी स्त्रीवाद -१९९३' या ग्रंथात मीस मारिया सांगते की, 'स्त्रियांच्या सर्वाधिक गरजा पर्यावरणातून पूर्ण होत असल्याने पर्यावरणाचा नाश करणाऱ्या शक्ती, घटकांना रोखण्यासाठी समाजातील तळागाळातील लोकसमूहांनी पुढाकार घेवून प्रयत्न करायला हवेत.'

सन १९७९ साली 'माईल्स थ्री आयलंड' येथील अणुकेंद्रात आयोडीनम, रेडीओ ॲक्टिव्ह वायूची गळती होऊन मोठा अपघात झाला. या घटनेच्या विरुद्ध पर्यावरणीय चळवळ प्रभावी झाली. त्यानंतर "Women and life on earth" या नावाखाली सन १९८० मध्ये ईशान्य अमेरिकेत इकोफेमिनिस्टांची परिषद पार पडली. यामध्ये life on earth चा अर्थ व्यापक करत निसर्ग, त्यावर उपजीविका करणारे समूह आणि शांततावादी समूह या सर्वांशी निगडीत नाते जोडले गेले. जर्मन स्त्रीवादी अभ्यासक मारिया मिस यांच्या 'Patriarchy and accumulation on world scale and international division of labour' या ग्रंथात स्त्रियांचे होणारे शोषण आणि पुरुषप्रधान व्यवस्थेने राबविलेले धोरणे, विकासप्रणाली यांची सविस्तर चर्चा केली. विज्ञानाचा विकास व पुरुषप्रधान व्यवस्थेला पोषक ठरवून विषमतेच्या विविध संरचना कशा निर्माण झाल्या, त्या टिकविण्यासाठी हिंसात्मक

वापर याविषयी मांडणी केली. अशा हिंसेस स्त्रीवादी चळवळीने विरोध केला आहे. राज्यसंस्था, समाज, कुटुंब यातील सत्तासंबंध लक्षात घेता स्त्री चळवळ युद्धाविरोधी, अण्वस्त्रविरोधी भूमिका घेते.

संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारा डिसेंबर २०१९ मध्ये 'माद्रिद' येथे संपन्न झालेली 'जागतिक हवामान परिषद (सीओपी -२५)' स्वीडनमधील १६ वर्षीय युवा पर्यावरण कार्यकर्ती ग्रेटा थनबर्गने तिच्या भाषणातून असा आरोप केला की, "व्यवसाय क्षेत्र आणि राजकारणातील नेते हवामानाच्या मुद्यावरून लोकांची दिशाभूल करीत आहे. शिवाय नेते वाटाघाटी करत आहेत, मात्र त्यातून तापमान वाढ रोखण्यासाठी कोणतीही कृती समोर येत नाही. ही हवामान आणीबाणी आहे. हे दिशा देणारे नाही तर दिशाभूल करणारे आहे. तापमानाच्या अंशाचा प्रत्येक भाग महत्वाचा ठरत आहे. त्याचा परिणाम सबंध जगावर होत आहे. विशेषतः लहान मुलांचे भविष्य हिरावून घेत आहे."

आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेमुळे, पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासामुळे आदिवासी समूहांच्या जगण्याच्या साधनांचा विनाश होतो आहे. मानवी जीवनाचे उद्दिष्ट हे केवळ विज्ञान तंत्रज्ञानाचा व भौतिक विकास साध्य करणे इतका मर्यादित नाही. किमान पक्षी सर्वांच्या गरजा पूर्ण होतील अशा छोटया उद्योगांना चालना देणे आहे. डॉ. वंदना शिवा 'staying a live' या ग्रंथात विज्ञानाची पद्धती व वाटचाल यावर पुरुषप्रधानतेचा प्रभाव मांडला आहे. त्यांनी सध्याच्या जागतिकीकरणाला पर्याय सांगितला आहे. उदा. १) दुर्बलांच्या आर्थिक व्यवहारांचे उद्दिष्टे स्पष्ट करून निसर्गाशी नातेसंबंध ठेवणारा आणि त्यांच्या किमान मुलभूत गरजा पूर्ण करणारा विकास हा नियोजनाची दिशा असावी. २) दैनंदिन जीवनजगण्याच्या पद्धती, आयुष्यातील संघर्ष हेच राजकारण मानले जावे. ३) सर्वांनीच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी. ४) उपयोजित विज्ञान तंत्रज्ञानाचा विकास करावा. ५) पर्यावरणीय दृष्टीकोन असणारी स्त्री चळवळ निर्माण करावी.

डॉ. मारिया मिस व डॉ. वंदना शिवा 'Ecumenism Reconnecting a divided world' - 1931 या ग्रंथात सांगतात की, 'भांडवली व्यवस्था व पितृसत्ता या कोणत्याही वेगळेपणाला समान दर्जा देत नाही'. बिना अग्रवाल त्यांच्या 'लिंगभाव आणि पर्यावरणाविषयक चर्चा' - १९९६ या ग्रंथात स्त्रीवादाविषयी विचार मांडते की, 'स्त्रियांचे जीवन पर्यावरणावर कसे अवलंबून आहे आणि पर्यावरणाच्या विनाशात स्त्रीचे निर्बलीकरणच होय' असा विचार मांडतात. ग्रॅब्रिअल डॅटीच यांच्या मते, 'आरोग्य तंत्रज्ञान आणि चुकीच्या पद्धतीद्वारे होणारी श्रमाची फेररचना, महत्वाच्या क्षेत्रातून स्त्रियांचे होत असलेले सिमांतीकरण ही चिंतेची बाब आहे.'[१६] बिना अग्रवाल १९९६ मध्ये म्हणतात की, 'विकासाची वर्गवारी करतांना स्त्रियांना एखाद्या देशातील स्त्रिया असा शब्द प्रयोग वापरून त्यांना एका गटात बसविणे योग्य होणार नाही. विकास हा नेहमी निर्वाह आधारित असावा. गरीब, दुर्बल स्त्रिया ज्या पारंपरिक ज्ञान, साधने यावर जगतात त्यांना सुरक्षित ठेवणे यासाठी निसर्ग आणि मानव यांच्या नात्यांचा नव्याने फेविचार होणे आवश्यक आहे.'[१७] थोडक्यात, पर्यावरणीय स्त्रीवादी विचारसरणीने पितृसत्ता, भांडवली उत्पादन व्यवस्था आणि उत्पादन संबंध प्रक्रिया यांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :**

१. पाश्चात्य देशांमध्ये १९ व्या शतकाच्या शेवटी स्त्रीवाद या विचारसरणीचा उदय झाला. स्त्रीवाद ही एक व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे. विभिन्न स्त्रीवादी विचारधारा केवळ स्त्रियांच्या प्रश्नांपुर्तीच मर्यादित न राहता व्यक्तीजीवनाच्या विविध क्षेत्रातील शोषणाविरुद्ध या चळवळी म्हणून कार्यान्मुख आहे.

२. स्त्रीवादी विविध विचारधारांचा विकास हा स्त्रियांचे अधिकार, स्त्रीशोषण, अन्याय, अत्याचार यांना विरोध करणाऱ्या चळवळीतून झाला आहे. म्हणून स्त्रीवाद हा केवळ विचार किंवा पुस्तकी संकल्पना न राहता व्यक्ती जीवनातील प्रत्यक्ष घटनांचा आधार तिला प्राप्त आहे.

३. भारतासारख्या तिसऱ्या जगातील देशांमध्ये सन १९६० नंतर स्त्रीवादी विचारधारेचा विचार गांभीर्याने होऊ लागला.

४. प्रबोधनोत्तर मुक्तीचा विचार व्यक्तीलक्षी, परलौकिक न राहता तो समाजसापेक्ष, व्यवस्थानिष्ठ, समष्टीलक्षी झाला. दलित मुक्ती, श्रमिक मुक्ती, स्त्री मुक्ती यातील ‘मुक्ती’ संकल्पना समष्टी वाचक राहिलेला आहे.

**समारोप :**

विसाव्या शतकात महत्त्वपूर्ण ठरलेला स्त्री सक्षमीकरण व स्त्री-मुक्तीचा लढा हा एकाच वेळी स्त्रीवर्गाच्या मुक्तीचाही लढा आहे व स्त्री-पुरुष समतेचा तसेच स्त्री वर्गांतर्गत स्त्री समतेचा ही लढा आहे. इतकेच नव्हे तर तो सर्व शोषित व दडपलेल्या वर्गाचाही लढा आहे आणि सर्वंकष समतेसाठीचा ही लढा आहे. त्यांच्या अंगी स्वतःच्या वतीने स्वतःसाठी बोलण्याची तसेच सर्वांच्या वतीने बोलण्याची हमी व क्षमता निर्माण होणे गरजेचे आहे. तशी ती निर्माण होण्यातूनच स्त्री सक्षमीकरण, स्त्रीमुक्ती यातून मानवमुक्तीची ग्वाही देऊ शकतो.

**संदर्भ :**

१. मंगुडकर मा.प. (संपा.), समता आणि संघर्ष, महाराष्ट्र शासन समाज कल्याण सांस्कृतिक कार्यालय, मुंबई, १९८७, पृष्ठ क्र. ७.

२. सुमंत यशवंत (डॉ.), स्त्रीवादाची ओळख, Published by Coordinator, CAS, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१२, पृष्ठ क्र. १२

३. वरखडे मंगला (डॉ.), स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजना, पृष्ठ क्र. १.

४. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००४, पृष्ठ क्र. १९१

५. विद्युत भागवत, स्त्रीवादी सामाजिक विचार, उपरोक्त -१०, पृष्ठ क्र.१८९.

६. गिया व्ही, उत्पादन, पुनरुत्पादन व पितृसत्ताक : जागतिक चर्चाविश्व, प्रवीण चव्हाण (अनु.), क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१०, पृष्ठ क्र. ७१.

७. गिया व्ही, उत्पादन, पुनरुत्पादन व पितृसत्ताक : जागतिक चर्चाविश्व, प्रवीण चव्हाण (अनु.), क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१०, पृष्ठ क्र. ७१.

८. जॅक्सन स्टेव्ही, स्त्रीवादी सामाजिक सिद्धांकन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २०११, पृष्ठ क्र. १२५.

९. कमल भागवत व अन्य, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रगती प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. क्र.४

१०. फेड्रिक एंगेल्स, दि ओरिजन ऑफ फॅमिली : प्राव्हेट प्रोपर्टी अँड स्टेट, प्रोग्रेस प्रकाशन, मॉस्को, पृष्ठ क्र. २०.

११. सुमंत यशवंत (डॉ.), स्त्रीवादाची ओळख, Published by Coordinator, CAS, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१२, पृष्ठ क्र. ७० व ७३.

१२. गोखले करुणा (अनु.) बोव्हूआ सिमोन, द सेकंड सेक्स, उपरोक्त-१८, पृष्ठ क्र. ५४६,५५२.

१३. Rose Marie, Tong, feminist thought, west view press, published, united State of America, 1989, page no. 96.

१४. फुले स्त्री चव्हाण प्रवीण, (स्वैर अनु.), प्रारंभीचे स्त्रीवाद, संदर्भ साहित्याचा वेध, क्रांतीज्योती सावित्रीबाई अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, सहाय्याने उच्च शिक्षण, उपक्रम नावाजबाई रतन टाटा ट्रस्ट, प्रकाशन वर्ष २०११, पृष्ठ क्र. १३९.

१५. Maggie Human, The Dictionary of feminist theory, Edinburgh, Great Britain, Third Edition2003. Page no 73.

१६. छाया दातार, श्रुती तांबे, स्त्री अस्तित्व, संघर्ष आणि सार्वभौमत्व : स्त्री अभ्यासासमोरील आव्हाने, स्त्री अभ्यास व्यासपीठ मुंबई,२०००, पृष्ठ क्र. २०.

१७. साधना, पर्यावरणीय स्त्रीवादाचे हस्तक्षेप, भागवत वंदना, सपकाळ अनिल, गीतांजली. (संपा.) शब्द पब्लिकेशन्स, मुंबई,२०१४, पृष्ठ क्र. ४४३